**दिव्य मराठी विशेष** • अपघाती मृत्यूनंतर पालकांना दिला पाच लाखांचा धनादेश

# मृत विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांना दिली मदत

**प्रतिनिधी** | यावल

येथील यावल महाविद्यालयातील बीए द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा गेल्या वर्षी अपघातात मृत्यू झाला होता. या विद्यार्थ्याच्या कुटुंबियांना विद्यापिठाकडून विद्यार्थ्यी कल्याण निधी, अपघाती विम्यातून पाच लाख दहा हजार रुपयांची मदत मिळाली. सोमवारी धनादेश वितरण करण्यात आले.

शहरातील बोरावल गेट भागातील विद्यार्थी पुंडलिक चंद्रकांत सोनवणे (वय १९) हा विद्यार्थी बी.ए.शाखेत द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत होता. गेल्या वर्षी १५ जून रोजी त्याचा यावल – भुसावळ रस्त्यावर दुचाकी अपघातात मृत्यू झाला होता. विद्यार्थ्याच्या मृत्यू पश्चात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांनी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विद्यार्थी अपघात विम्यासंदर्भात विद्यापीठाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे विद्यार्थी कल्याण निधी १० हजार आणि विम्याची रक्कम पाच लाख असा एकूण पाच लाख दहा हजारांचा धनादेश सोमवारी विद्यार्थ्याच्या कुटुंबियांना साऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आला.

यावेळी मृत विद्यार्थ्याचे वडील चंद्रकांत सोनवणे, आई वंदना सोनवणे यांना धनादेश देण्यात आला. मराठा विद्या प्रसारक सह समाज संस्थेचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब वामनराव निंबाळकर, संचालक जयवंतराव देशमुख व प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे, उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, एम. डी. खैरनार उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुधा खराटे यांनी केले. आभार एस. पी.कापडे यांनी मानले. प्रा. डॉ. पी. व्ही. पावरा, प्रा .एस. आर. गायकवाड, मिलिंद बोरघडे यांनी सहकार्य केले. या मदतीमुळे मृत विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.



यावल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अपघाती मृत्यू पश्चात कुटुंबीयांना पाच लाखाचा धनादेश देताना प्राचार्य संध्या सोनवणे, संस्था पदाधिकारी.